महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

# उपसंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक: ४८२(५५)/१०६१/ पंधरा-अ** **जाहिरात क्रमांक : १०७/२०२१**

महाराष्ट्र शासनाच्या **सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील** **उप संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ** या संवर्गातील ९ पदावरील भरतीकरीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

## २ . उपलब्ध पदसंख्या :- ९

**२.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ.ज. (ड) | वि. मा. प्र. | आ.दु.घ | इ.मा.व. | एकूण आरक्षित पदे | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | ५ | ४ | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/ समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | ४ | ३ | ७ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |

२.२ वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

## ३. पात्रतेचे निकष :-

### ३.१ भारतीय नागरिकत्व

### ३.२ वयोमर्यादा :-

### ३.२.१ किमान व कमाल वयोमर्यादा

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार |
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ/ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ/ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ/ अनाथ | |
| १ फेब्रुवारी, २०२२ | १८ | ४५ | ५० | ४५ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

**३.२.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पात्र कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**३.२.३** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु, आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील, तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल.

**३.२.४** अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.

**३.२.५** अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरण्याकरीता विचारात घेतला जाईल.

### ३.३ शैक्षणिक अर्हता

**३.३.१** M.B.B.S. Degree of a Statutory University or any other qualification specified in the First or Second Scheduled to the Indian Medical Council Act. 1956;

**३.३.२** Possess post-graduate degree or a post-graduate diploma in any of the qualifications specified in the First or Second Schedule to the Indian Medical Council Act, 1956. or any other qualification recognized as equivalent thereto by the Medical Council of India;

**And**

### ३.४ अनुभव:-

**३.४.१** Experience of Health administration, medical relief or family welfare under Government, Zilla Parishad or a Local Body for not less than five years in case of those holding post graduate degree and for not less than Seven years in the case of those holding post graduate diploma, gained after acquiring the post graduate diploma or the post-graduate degree, as the case may be and out of which experience for four years shall be in class I post or in a equivalent thereto.

**३.४.२** सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२३ – ६७७००-२०८७००/- ही वेतनश्रेणी घेत असलेली नियमित पदे गट-अ (वर्ग -१) ची आहेत.

**३.५** शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:-

**३.५.१** प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.५.२** अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**३.६ दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण**

**३.६.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**३.६.२** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक - संकिर्ण २०२०/प्र.क्र-१०३/सम -२, दिनांक १७ जून,२०२१ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती / उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र असेल :-

(१) L.V. (२) H.H. (३) OA

**३.६.३** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**४. संवर्ग/पद तसेच आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तपशील:-**

**४.१ सर्वसाधारण :-**

**४.१.१** वेतनश्रेणी : S – २५ : रुपये ७८,८०० – २,०९,२००/- अधिक नियमाप्रमाणे अनुज्ञेय भत्ते-

**४.१.२ कर्तव्ये व जबाबदा-या**:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**४.१.३** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेचा भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५० च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे, तोच अर्थ असेल.

**४.१.४** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**४.१.५** अराखीव (खुला) पदाकरीता सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारानी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**४.२ आरक्षण :**

विविध मागासप्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यांदीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

**४.३ इतर अटी :-**

**४.३.१** The selected candidate will have to sign an agreement embodying the conditions of his service including the condition to serve Government for a period of **5 years** or to penalty of **Rs.500/-** or such other sum as may be prescribed by Govt.

**४.३.२** The selected candidate will have to get himself / herself registered under Maharashtra Medical Council Act 1965, before joining of his / her name should be borne in Indian Medical Council Register.

**४.३.३** The selected candidates will be debarred from doing any private practice but will be paid compensatory allowance in lieu according to the rules..

**४.३.४** Period of probation will be two years

**५. निवड प्रक्रिया:-**

**५.१** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

**५.२** जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जाची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

**५.३** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

**५.४** चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी (लागू असल्यास) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**५.५** चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

**५.६** मुलाखतीमध्ये किमान ४१% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

**५.७** सेवाभरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया **उपसंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ** या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम आणि तद्नंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

**६. अर्ज करण्याची पद्धत:-**

**६.१** अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**६.२** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**६.३** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

**६.४** अर्ज सादर करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**६.५** अर्ज सादर करण्याचे टप्पे:-

**६.५.१** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापुर्वी विहित पध्दतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करुन खाते (Profile) तयार करणे.

**६.५.२** खाते तयार केलेले असल्यास व ते अदययावत करण्याची आवश्यकता असल्यास अद्ययावत करणे.

**६.५.३** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड करून अर्ज सादर करणे.

**६.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**६.६** विहित प्रमाणपत्र/कागदपत्रे अपलोड करणे.

**६.६.१** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करावी लागतील :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ६ | अद्यावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १२ | एस.एस.सी. मधील नावात बदल झाल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १५ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १६ | राज्य शासकीय यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १७ | महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम १९६५ / भारतीय आयुर्विज्ञान परिषद अधिनियम १९५६ अन्वये नोंद केलेल्या प्रमाणपत्राची प्रत | PDF | ५० | ५०० |

**६.६.२** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**६.६.३** अद्ययावत नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-याने वितरीत केलेले व प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे (वित्तीय वर्ष २०२१-२०२२) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**६.६.४** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**६.६.५** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**६.६.६** उपरोक्त कागदपत्रांव्यतिरिक्त शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाच्या दाव्यासंदर्भातील शोधनिबंध, पुस्तके अथवा पुस्तकांमधील प्रकरणे, इत्यादीबाबतच्या स्वसाक्षांकित प्रती यांचा संच अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर ७ दिवसांच्या कालावधीमध्ये आयोगाच्या मुख्य कार्यालयामध्ये पोहोच होतील अशा रितीने सादर करणे अनिवार्य आहे.

**६.६.७** आयोगास पाठविण्यात येणा-या कागदपत्रांच्या संचावर पदाचे नांव, जाहिरात क्रमांक व अर्जाचा क्रमांक स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. त्याशिवाय संबंधित कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

**६.७ अर्ज सादर करण्याचा कालावधी:- दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.८** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**६.९ शुल्क रुपये:**

**६.९.१** अराखीव (खुला)- **७१९/- रुपये**

**६.९.२** मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक व अनाथ - **४४९/-** रुपये

**६.९.३** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक शुल्क तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**६.९.४** परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

**६.१०** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

**६.१०.१** शुल्क भरण्याकरिता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

**६.१०.२** 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

**६.१०.३** 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील:- **(१)** ऑनलाईन पेमेंट **(२)** चलनाद्वारे

**६.१०.४** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**६.१०.५** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**६.१०.६** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**६.१०.७** **ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.१०.८** **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**६.१०.९** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरती प्रकियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**८.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ठिकाण: मुंबई.**
**दिनांक : ८ ऑक्टोबर, २०२१**

**सह सचिव, (जाहिरात)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

| |
|---|
| (१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.<br>(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल. |